# कुमारजी – एक चिरंतन सूर

– पुष्करराज आपटे

शिवपुत्र सिद्धरामय्या कोमकली अर्थात पंडित कुमार गंधर्व ह्यांच्यावर इतकं बोललं आणि लिहिलं गेलं आहे की अजून एक लेख कशाला हा प्रश्न स्वाभाविक आहे. त्यांचं तेराव्या वर्षी जिना हॉल मधे झालेलं गाणं, ते ऐकून आश्चर्यचकित झालेले दिग्गज, मोठ्या गायकांच्या रेकॉर्ड ऐकून त्यांची गायकी (नक्कल नाही) हुबेहूब सादर करण्याचं कसब, पुढे देवधर मास्तरांकडे मिळालेली तालीम, जिवावर उठलेला आजार आणि पाच वर्षांचं मौन, त्यातून फिनिक्स पक्षासारखं झालेलं त्यांचं पुनरागमन, नंतर भानुमतीताईंचं अकाली जाणं, गीतवर्षा किंवा गौडमल्हार दर्शन सारखे त्यांचे गाण्यातले 'प्रयोग', धूनउगम रागांची निर्मिती आणि कबीराच्या फकिरी वृत्तीचा त्यांनी घेतलेला 'निर्गुणी' शोध – ह्याच्या अनेक कथा (आणि काही दंतकथा सुद्धा) आजही लोक एकमेकांना सांगतात.

कुमारजी गेले तेव्हा ज्याचा जन्म सुद्धा झाला नव्हता असा विशीत असलेला, रात्री उशीरापर्यंत जागून युरोपियन फुटबॉल बघणाऱ्या पिढीचा माझा पुतण्या आज कुमारजीचं एखादं नवीन रेकॉर्डिंग सापडल्याचं समजलं की लगेच ऐकण्यासाठी भुणभुण लावतो. फेसबुकच्या 'मुकुल शिवपुत्र' ग्रुपमुळे ओळख झालेले आम्ही जे आठ–दहा कुमारवेडे आहोत त्यात पण केस पांढरे झालेला मी एकटाच आहे. कुमारजी डिजिटल युग येण्याआधीच गेले, पण आपल्या सुदैवाने त्यांचं गाणं जतन करून ठेवण्याचं सत्कार्य अनेकांनी करून ठेवलं आहे, त्यामुळेच आज गूगलवर Kumar G एवढंच टाइप करून होईपर्यंत हजारो सर्च रिझल्ट आपल्याला मिळतात. पण कुमारांचं गाणं असं चिरंतन राहिलं आहे ते केवळ लोकांनी ते ध्वनिमुद्रित करून ठेवलं आहे किंवा त्यांच्याबद्दल अनेक लेख, पुस्तकं, आणि त्यांच्या मुलाखती उपलब्ध आहेत म्हणून नव्हे. ह्या तर झाल्या इतरांनी केलेल्या गोष्टी. ह्यामागचं सगळ्यात मोठं कारण कुमारजींच्या विचारात आणि गाण्यातच आहे.

'अगणित रवि शशि' मी दोन–पाचशे वेळा तरी ऐकून झालं असेल, तरी परत ऐकताना एखादी जागा विजेसारखी चमकून जाते आणि प्रश्न पडतो – अरे? हे आधी कसं सापडलं नाही आपल्याला? एकदा भूप मधला तराणा सुरु केल्यानंतर मधेच थांबून 'उकाडाही फार आहे, लोकांनी जरा गप् बसलं तर चांगलं काहीतरी ऐकायला मिळेल" असं कुमारजी जरा वैतागून म्हणलेत – ते ऐकून मी आज सुद्धा त्या ठिकाणी पुढचा तराणा ऐकायला जरा सावरून बसतो. "मी आता आपल्याला मालव बिहागडा ऐकवणार आहे, नुसताच ऐकवतो, नुसताच म्हणजे ठेक्यावर नाही. म्हणजे मला ठेक्यावर गाता येत नाही असं नाही हां!" – हा त्यांचा मिष्किलपणा ऐकून आजही हसू येतं. एकदा असंच गाणं थांबवून, पण ठेका न सोडता 'ये क्या हो रहा है' हे देखील सुरात आणि मध्यलयीत म्हणून 'है' वर सम गाठण्याची गंमत करून गेले. ह्या माणसाच्या डोक्यात त्या वेळी नक्की काय चाललं होतं हा प्रश्न आजही पडतोच. एक न दोन – अनेक उदाहरणं सुचतात – पण त्यांच्या गाण्याची जी मनावर पकड बसली आहे ती इतक्या वर्षांनंतर कणभरही कमी झालेली नाही.

पहिलं कारण आहे त्यांच्या गाण्यातलं वैविध्य. विलंबित एकतालातल्या तासभराच्या बडा ख्याल पासून चार–पाच मिनिटांच्या निर्भय निर्गुण गुण रे गाऊं पर्यंत आणि बालगंधर्वांच्या मला मदन भासे पासून माळव्यातल्या एखाद्या

कानफट्या साधूकडून ऐकलेल्या मै जागूं मेरा सतगुरू जागे पर्यंतचा शोध कुमारजींनी आपल्या गायनातून घेतलाय त्याचा आवाका विलक्षण आहे. बरं, एक राग म्हणावा तर त्याचीच अनेक रूपं त्यांना दिसली, आणि त्यांनी ती आपल्याला आवर्जून दाखवली सुद्धा. मैफिलीत तीन–चार वेगवेगळे राग, मग एखादं भजन किंवा नाटकातील पद, आणि शेवटी भैरवी असा साचा मोडून अख्ख्या मैफिलीत एकाच रागाच्या बंदिशी सादर करण्याचं धाडस कुमारजींकडे होतं. आणि मुख्य म्हणजे त्यांच्याकडे तेवढा अफाट संग्रहही होता. स्वातंत्र्यपूर्व काळात पाकिस्तान मधे भेटलेल्या कोणा एका तुलसीदास शेठ कडून एक गौडमल्हार ऐकला तो त्यांच्या डोक्यात नंतर वीस–पंचवीस राहिला, आणि ६८–६९ च्या सुमारास त्यांना गौडमल्हारदर्शन हा कार्यक्रम बसवताना त्यांना त्याच्यासाठी योग्य अशी जागा सापडली. कल्याण के प्रकार, भैरव के प्रकार, बागेश्री दर्शन, ह्यातून त्यांची अभ्यासू वृत्ती आणि प्रस्तुतीतील कौशल्यही लक्षात येतं. मुकुल एकदा एका कार्यक्रमात म्हणला होता "शोध आणि प्रस्तुती ह्या दोन्ही प्रांतात तितक्याच ताकदीने वावरणारा एकच कलाकार बघितला – कुमार गंधर्व" – ही अतिशयोक्ति नक्कीच नाही. ह्या त्यांच्या शोध–वृत्तीमुळे लक्षात येणारं दुसरं कारण म्हणजे कुमारजींच्या गाण्यामधून डोकावणारे त्यांचे विचार.

ठुमरी, टप्पा आणि तराणा हे प्रकार गायक अनेक शतकं गात आले आहेत. पण ह्या तिन्हीत काही दुवा आहे का ह्याचा शोध घेऊन श्रोत्यांसमोर तो विचार मांडणारे कुमारजी पहिलेच. अति द्रुत लयीत ताना घेऊन तराणा गात वाहवा मिळवणारे गवई अनेक होऊन गेले. पण एखाद्या रागात 'आता सगळं सांगून झालं, तरी काहीतरी सांगायचं राहून गेलंय असं वाटतं, तेव्हा जो जन्म घेतो तो 'अर्थहीन' असे बोल असलेला पण तरीही आशय घेऊन येणारा असा तराणा' हा त्यांचा विचार ह्याआधी कोणी मांडल्याचं ऐकिवात नाही. गाण्यात हरवून जाणे, त्यात तल्लीन होणे, त्यात ईश्वराचा शोध घेणे हे आपण अनेकदा ऐकतो, पण विचार करून गाणे (आणि तरीही त्यात पांडित्य आणून ते कंटाळवाणं न होऊ देणे हा कुमारजींचा गुण मला फार महत्त्वाचा वाटतो. एकदा नंदकेदार मधे 'ला दे बिरा म्हारे चुनरी' गाता गाता थांबून म्हणले, "त्या नंद आणि केदारची दोस्ती चालली आहे, मी कशाला त्यांच्या मधे येऊ?" शिवाय गाताना उगाच काहीतरी कोलांट्या उड्या मारून भाव खाणे असला प्रकार कुठेही नाही. असंच एकदा हमीर मधे मध्यलयीतली चीज संपवून द्रुत त्रितालात जा रे जा रंगरेजा सुरू केलं, तशी लगेच श्रोत्यांकडून आहाहा, वा–वा झालं. त्यावर एकदम थांबून "काय करावं बाबा, काही नाहीये, तरकीबी असतात. ह्यामधे वेगळं काहीच नाही, सगळी बदमाशी आहे." असं म्हणाले ! म्हणजे उगीचच मी कशी जादू करून दाखवतो तुम्हाला बघा, असला आव नाही. अशा प्रकारे श्रोत्यांना बरोबर घेऊन गात गात जाणे हे ह्या शोधातलं तिसरं कारण वाटत राहतं – 'कुमाराचं प्रवाही गाणं.'

ह्याची सर्वोत्तम उदाहरणे म्हणजे कुमारजींचे गाण्यातले अनेक 'प्रयोग', आणि अर्थातच त्यांचे 'मुक्काम वाशी' हे चर्चासत्र. अरे बघा, हा बागेश्री वेगवेगळा कसा दिसतो मला. तुम्ही पण बघा – ही त्यांची कळकळ मनाला स्पर्श केल्याशिवाय राहत नाही. बागेश्रीचा चेहरा टेसूल बन फूले मधे वेगळा आणि फेर आई मोरा अंबुवा पे मधे वेगळा हा लागलेला शोध त्यांना सर्वांना सांगायचा होता. एखाद्या छोट्या मुलाला बटण दाबल्यावर दिवा लागतो हा शोध एखादी जादू सापडावी तसा असतो. आपल्याला त्याचं फारसं विशेष नसलं तरी त्या मुलाला तो शोध गुरुत्वाकर्षणाच्या शोधाइतकाच महत्त्वाचा असतो. नंतर ते मूल सारखा तोच उद्योग करत राहतं कारण त्याचं कुतूहल एकदाच दिवा लावून शमत नाही. कुमारांच्यातलं असं कुतूहल जिवंत ठेवणारं मूल त्यांच्या प्रत्येक गाण्यात आपल्याला भेटत राहतं.

मुलाला 'आता बास बटणाशी खेळणं' असं म्हणण्याऐवजी ज्यांना परत परत दिवा लागल्याची गंमत वाटते अशा सर्वांना कुमारजींचं गाणं कधीच कंटाळवाणं होत नाही.

ह्या ओघाने येणारं चौथं कारण म्हणजे बंदिशीचे शब्द नीट उच्चारण्याचा त्यांचा कटाक्ष. पावा मै दूरासे ही श्री रागातली अप्रतिम बंदिश त्यांनी मुंबई–नागपूर प्रवासात दूर टेकडीवर असलेल्या एका देवळाकडे बघून केली. त्यांना तिथे जाण्याची ओढ होती पण ते कधी जमलं नाही. आता ही पार्श्वभूमी लक्षात घेता दूरासे मधला दूरा ह्या अक्षरांचा 'नाद' त्यांना रंगवणाऱ्या सा–प ह्या स्वरांइतकाच महत्त्वाचा आहे. शब्दच कळले नाहीत तर बंदिश गायली काय आणि नुसतेच अगम्य शब्दात सुरांचे फराटे मारले काय, चित्राचा बेरंग होणारच. बळी देण्यासाठी घेऊन चाललेल्या बोकडाकडे बघून सुचलेली मधसुरजा ची 'बचा ले मोरी मैया', सामान उचलणाऱ्या हमालाला बघून झालेली 'लदा ले लदा ले', मित्राकडे होळी खेळायला बोलावणे आल्यावर सुचलेली 'आप के बुलावा' – ह्या सगळ्या बंदिशींचे शब्द नेमकेपणाने आपल्यापर्यंत पोचले नसते तर त्यात काय गंमत राहिली असती? एकदा तर वसंतराव देशपांड्यांबरोबर झालेल्या पत्रव्यवहारातूनच एक बंदिश निर्माण झाली.

वसंतरावांनी लिहिलं – मैं आऊं तोरे मंदरवा, पैयां परत देहो मोहे मनबसिया
त्यावर कुमारजी उत्तरले – अरे मेरो मढैयां तोरा आहे रे, काहे चरन धरो मोरे मनबसिया
झाली. मधुवंती मधे एक छान बंदिश झाली!

कुमारजींना अनेकदा बंडखोर, विद्रोही अशी विशेषणं लावली जातात. मला स्वत:ला ते पटत नाही. विद्रोही म्हणजे प्रस्थापित व्यवस्था न पटल्याने ती उलथून टाकणारा (म्हणजे भगतसिंह सारखा). कुमारजींनी असलेली व्यवस्था उधळून लावण्याचा कधीच प्रयत्न केला नाही. उलट त्यांनी त्याचा आदरच केला नेहमी. पण त्यांना त्या मार्गावर आंधळ्यासारखं चालत राहणं मात्र मान्य नव्हतं. जुनं ते सोनं हे ठीक आहे, पण त्या जुन्या सोन्याचे नवीन दागिने करून बघायला हरकत नाही अशा त्यांच्या विचाराला विद्रोही म्हणायचं हे कितपत बरोबर आहे? त्यांनी एकाच घराण्याचं कुंकू लावण्यात धन्यता मानली नसेल, पण उलट त्यांनी प्रत्येक घराण्याच्या गायकीचा बारकाईने अभ्यास केला ह्यात विद्रोह कसा काय होतो? कदाचित आजच्या तरुणांना त्यांच्या गाण्याचं वेड लागण्यामागे हे पण कारण असेल. कारण कुमारांसारखीच आजची पिढी पण सगळ्याच पारंपारिक चौकटी मोडीत काढायला निघाली आहे असा जो कायम आरोप होतो तो मला नेहमीच अयोग्य वाटत आला आहे.

तरूण पिढीला हे गाणं भावण्याचं एक महत्त्वाचं कारण म्हणजे ह्यात लपवाछपवी नाही. आधीच शास्त्रीय संगीत समजायला क्लिष्ट असतं अशी समजूत आहे. त्यात गायकाने आपण करतोय ते लोकांना कसं समजत नाहीये ह्यातच आनंद मानला तर अजून पंचाईत. कुमारजींकडे हा प्रकार नाही. जरा आलाप झाला की – "इस राग का नाम है, शुद्ध श्याम" – असं सांगून मोकळे. अर्थात, हया बाबतीतली त्यांची सगळ्यात मोठी कामगिरी म्हणजे अनूपरागविलास! नवीन राग आणि बंदिशी निर्माण केल्या त्याबद्दल विनाकारण गोपनीयता पाळली नाही. म्हणजे एखादी चीज शिष्यांना द्यायचीच नाही, दिली तर एकालाच, त्यात पण नुसता अंतराच शिकवायचा, असला 'चोरून डबा खाणे' हा प्रकार नाही. बंदिशींचे नोटेशनसहित पुस्तक तयार. नवीन निर्माण केलेल्या रागांचे तर आरोह–अवरोह, पकड (ज्याला

कुमारजी रागात्मा असा जास्त समर्पक शब्द वापरतात), ताना–पलटे, सगळं छापून मोकळे. आजच्या तरुणांना हा मोकळेपणा, तसंच ऐकणाऱ्यांबरोबर संवाद साधायची कला नक्कीच भावत असणार. मला खात्री आहे की आज कुमारजी असते तर त्यांनी नक्कीच हा संवाद चालू ठेवण्यासाठी एखादा ब्लॉग केला असता, आणि कदाचित चॅट करता करता एखादी बंदिश बांधून 'काय मजा आहे यार' असंही म्हणले असते!

शेवटी अजून एक कारण सुचतं. कुमारजी प्रत्येक गोष्टीकडे ज्या पद्धतीने बघायचे ती तशीच्या तशी आपण बघू शकत नाही. पण ते सांगतात तसं – "तुम्ही सकाळी फुलं जशी दिसतात तशी संध्याकाळी दिसत नाहीत, हे बघितलंय का?" – तो प्रयत्न आपल्याला करून बघायला हरकत नाही. (त्यासाठी सकाळी आधी उठायला हवं.) कुमारजींना पूरियाधनाश्री च्या आजरा दिन डूबा ची संध्याकाळ ही कुठलीही असून  चालत नाही. त्यांच्या मते ती उन्हाळ्यातलीच संध्याकाळ असते. आता ऑफिस, गाडी आणि घर हे तिन्ही एअरकंडिशन्ड असले तर उन्हाळ्याची आणि हिवाळ्याची संध्याकाळ वेगळी कळणार कशी काय? नेहमी जमत नाही, पण कधीतरी जमतं हे आपलं नशीब समजायचं. अनेक पौर्णिमा येतात आणि जातात. पण जेव्हा दुर्गा रागातल्या आनंद झरायो री च्या अंतऱ्यातली 'चितवत मन' ही जागा शरद पौर्णिमेला मात्रा वेगळीच भासते तेव्हा कुमारजींच्या गाण्याची चिकित्सा करण्यापेक्षा ऐकण्यात मजा आहे हे कळतं !

रात्र झालेली असावी. उशीरा जेवण होऊन छानपैकी पान लावलेलं असावं. यमन, मारवा वगैरे संध्याकाळची मंडळी आपला कार्यभाग उरकून मैफलीत बाजूला बसलेली असावीत, आणि मालकंस चाललेला असावा. चांगले दोन तास वेगवेगळ्या बंदिशी ऐकल्यानंतर 'आनंद मना' सुरू व्हावी, आणि आपण एकतालाच्या ठेक्यावर मान हलवावी तेव्हढ्यात मालकंसला रूढीप्रमाणे वर्ज्य असलेला पंचम लागून जावा. अशा वेळी एकच वाटतं – की आपल्याकडे हनुमान, परशुराम, बिभीषण असे सात चिरंजीव आहेत असं सांगतात. कुमार त्या अर्थाने चिरंजीव नसले तरी त्यांचे गाणे नक्की चिरंजीव आहे.